# चंद्रपूर जिल्हा पोलीस

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०८ एप्रिल, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


## भद्रावती पोलीसांची हातभट्टी दारू तयार करणाऱ्याविरूध्द कार्यवाही

दिनांक ०७ एप्रिल २०२० रोजी पोलीस स्टेशन भद्रावती येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम बरांज तांडा ते बोनथळा रोडचे बाजुच्या झुडपीजंगलात गुळ सळवा दारू तयार करण्याकरीता ड्रम लावलेले आहे. अशा माहितीवरून भद्रावती पोलीस पथकाने तात्काळ एक पथक तयार करून मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी पाचारण केले. पोलीस पथक पोहचुन सदर ठिकाणी छापा टाकला असता, २६ मोठे प्लास्टीक ड्रम २०० लीटर प्रमाणे किं. १०,४०,०००/—रू, आणि इतर साहीत्य असा एकुण **१०,६६,०००/—रू** चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन भद्रावती येथे अज्ञात आरोपींविरूध्द नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास भद्रावती पोलीस करीत आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ.श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन भद्रावती पोनि. श्री. पवार यांचे नेतृत्वात पोउपनि. श्री. तुळजेवार, पोउपनि. श्री. ठाकुर आणि पोलीस स्टेशन भद्रावती येथील कर्मचारी यांनी पार पाडली.

———————————————————————————————————